# मेट्रो ३ची दुसरी गाडी मुंबईत दाखल

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा ते सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेची आठ डब्यांची दुसरी गाडी गुरुवारी मुंबईत दाखल झाली. आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथील ऑल्स्टॉम कंपनीच्या कारखान्यात तयार झालेल्या या गाडीला मेट्रोच्या सारिपूत नगर येथील तात्पुरत्या उभारलेल्या कारशेडमध्ये नेण्यात आले. या ट्रेनच्या सारिपूत नगर आणि सहार येथील रॅम्पदरम्यान ५ किमीच्या अंतरावर पुढील चाचण्या घेतल्या जाणार आहेत.

मेट्रो ३ मार्गिकेचा आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत सुरू करण्याच्या दृष्टीने मुंबई मेट्रो

## पाच किमीच्या अंतरावर चाचण्या होणार

रेल कॉर्पोरेशनने नियोजन केले आहे. त्यादृष्टीने एमएमआरसीने तयारी सुरू केली आहे. सद्यस्थितीत या मेट्रो मार्गिकेवर स्टॅटिक आणि डायनॅमिक अशा विविध चाचण्या सुरू आहेत. तर ओव्हरहेड कॉन्टॅक्ट सिस्टीमचे ५३ टक्के, वीज जोडणी प्रक्रिया बसवण्याचे ८८ टक्के या प्रकारे कामे पूर्ण झाली आहेत. या मेट्रो मार्गिकेवर विविध स्थानकांत मिळून आत्तापर्यंत १०५ सरकते जिने, १९ उद्वाहक, १० प्लॅटफॉर्म स्क्रीन दरवाजे आणि १२ प्रवासी माहिती डिस्प्ले सिस्टीम बसवण्यात आली आहे, अशी माहिती एमएमआरसीचे प्रणाली विभागाचे संचालक ए. ए. भट्ट यांनी दिली.

### आधीच्या चाचण्या यशस्वी

आता दाखल झालेल्या दुसऱ्या गाडीचे डबे एकत्र करून त्यांची चाचणी घेतली जाईल. तसेच यापूर्वी दाखल झालेल्या पहिल्या गाडीने १,५०० किमीपेक्षा जास्त ट्रायल रनद्वारे सर्व डायनॅमिक आणि स्टॅटिक चाचण्या यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत, असे एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.